सकाळ

# ससून रुग्णालयास वैद्यकीय उपकरणे भेट

**पुणे** : फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाउंडेशन यांच्याकडून ससून रुग्णालयाला दोन कोटी रुपयांच्या अर्थसाह्यातून अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे देण्यात आली. १६ एप्रिलला या अद्ययावत यंत्रणेचे उद्‌घाटन होणार आहे. एंडोस्कोपी युनिट आणि एनआयसीयू या विभागात ही यंत्रणा बसविण्यात येत आहे. एंडोस्कोपी युनिटमध्ये किरणांपासून बचावासाठी अल्ट्रा साउंड विथ हेड प्रोटेक्शन, थायरॉइड शिल्ड, लीड ॲप्रॉन, प्रोटेक्टिव्ह आय गिअर्स, ओजिडी स्कोप आदी उपकरणांचा; तर एनआयसीयूमध्ये क्रिटिकूल, अत्याधुनिक सेंट्रल एअर प्रेशर, दोन, सिपाप, ब्लड गॅस ॲनालायझर, ब्रेन ॲनालायझरचा समावेश आहे.

Pune, Pune-Today
11/04/2019 Page No. 10